# ‘सोंगटी’चा प्रवास रंगमंचावर

पुणे टाइम्स टीम

सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त त्यांच्या शैक्षणिक कार्याला अभिवादन करण्यासाठी ‘सोंगटी’ या नाटकाच्या प्रयोगाचं आयोजन आज (दि. ६) करण्यात आलंय. सामाजिक संस्था आणि क्वीकहिल फाउंडेशनच्या ‘शाळांगण’ प्रकल्पाअंतर्गत होणाऱ्या या नाटकामध्ये अभिनेत्री माधवी सोमण आणि अंजली धारू यांनी काम केलंय.

बाबुराव सणस कन्याशाळा, मंगळवार पेठ इथं दुपारी ३ वाजता हे नाटक होईल. नाटकाचा विषय मुलींच्या शिक्षणावर आधारित असेल. आजच्या काळात मुलींचं शिक्षण किती महत्त्वाचं आहे आणि कितीही खडतर जीवन वाट्याला आलं, तरी संघर्ष करून गरीब घरातील सोंगटी शिक्षण पूर्ण करून स्वत:च्या पायावर कशी उभी राहते, हे नाटकातून दाखवण्यात आलंय. हा प्रयोग सर्वांसाठी विनामूल्य खुला असेल.